
# प्रकरण १०.
# भारतीय न्यायव्यवस्था

- न्यायव्यवस्था हे शासनसंस्थेचे तिसरे महत्त्वाचे अंग आहे. संघराज्यातील घटकांमधील तंटे, शासन व जनता यांमधील तंटे तसेच जनतेमधील आपापसातील तंटे सोडविणे, हे न्यायव्यवस्थेचे प्रमुख कार्य आहे. तसेच घटनात्मक तरतुदींचा अर्थ लावण्याचेही कार्य न्यायालयामार्फत केले जाते.
- भारताच्या एकात्मक न्यायव्यवस्थेत संपूर्ण गणराज्यासाठी न्यायालयांची एकच शृंखला असून तिच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय आहे. त्यानंतरच्या पातळीवर घटकराज्यात उच्च न्यायालये आहेत. उच्च न्यायालयाच्या नंतरच्या पातळीवर अन्य न्यायालयांची एक शृंखला आहे. त्यांना कनिष्ठ न्यायालये असे म्हणतात.

## रचना



| | | | |
|---|---|---|---|
| १२४ | सर्वोच्च न्यायालयाची स्थापना आणि घटना | १२५ | न्यायाधीशाचे पगार इत्यादी |
| १२६ | कार्यार्थ मुख्य न्यायमूर्तीची नियुक्ती | १२७ | हंगामी न्यायाधीशांची नियुक्ती |
| १२८ | सर्वोच्च न्यायालयाच्या बैठकीत निवृत्त न्यायाधीशांची उपस्थिती | १२९ | सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय |
| १३० | सर्वोच्च न्यायालयाचे कार्यस्थान | १३१ | सर्वोच्च न्यायालयाची अव्वल अधिकारिता |
| १३१अ | (निरसित) | | |

# सर्वोच्च न्यायालय (Supreme Court)

## ❖ तरतुद :–



- भारताचे सर्वोच्च न्यायालय २८ जानेवारी, १९५० रोजी अस्तित्वात आले. सर्वोच्च न्यायालयाने १९३५ च्या कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या फेडरल कोर्ट ऑफ इंडियाची जागा घेतली. कलम १२४ (१) अन्वये, भारताचे एक सर्वोच्च न्यायालय असेल, ज्यामध्ये एक सरन्यायाधीश आणि अन्य न्यायाधीश असतील. घटनेने अन्य न्यायाधीशांची संख्या किती असावी हे ठरविण्याचा अधिकार संसदेला दिला आहे.
- राज्यघटनेच्या पाचव्या व सहाव्या भागात घटनेच्या कलम १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आहे. हे सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) भारतात नवी दिल्ली येथे आहे.

## ❖रचना :

- मूळ घटनेमध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या आठ (एक सरन्यायाधीश व ७ अन्य न्यायाधीश) इतकी ठरविण्यात आली होती. त्यानंतर संसदीय कायद्याद्वारे अन्य न्यायाधीशांची संख्या क्रमाक्रमाने वाढविण्यात आली :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९५६ मध्ये १० | २ | १९६० मध्ये १३ | ३ | १९७७ मध्ये १७ |
| ४ | १९८६ मध्ये २५ | ५ | २००९ मध्ये ३० | | |

- पण २१ फेब्रुवारी २००८ पासून ३० इतर न्यायाधीश व १ सरन्यायाधीश अशी एकूण ३१ इतकी संख्या निश्चित आहे. प्रत्यक्षात २६ न्यायाधीश आहेत.

## ❖पात्रता :

१) उच्च न्यायालयात ५ वर्षे न्यायाधीश या पदावर काम केले असले पाहिजे किंवा उच्च न्यायालयात १० वर्षे वकीलीचा अनुभव.
२) सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती करताना राष्ट्रपती सेवा ज्येष्ठतेनुसार नियुक्ती करतात.

## ❖सरन्यायाधीशांची नेमणूक:-

- सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींकडून होते. राष्ट्रपती सरन्यायाधीशांची नेमणूक करताना सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना सल्ला घेऊ शकतात. मात्र असा सल्ला घेणे राष्ट्रपतीवर बंधनकारक नाही.
- ६ ऑक्टोबर १९९३ रोजी न्यायालयाने दिलेल्या निकालात असे म्हटले आहे की भारताचा सरन्यायाधीश म्हणून नेमणूक केली जावी. त्यामुळे आता ज्येष्ठतम न्यायाधीशांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नेमणूक केली जाते.
- सर्वोच्च न्यायालयाच्या आणि उच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांच्या नेमणुका करताना राष्ट्रपती सरन्यायाधीशांचा सल्ला घेतात. आवश्यकता भासल्यास इतर न्यायाधीशांचाही सल्ला घेतला जातो. तथापि या बाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे की नेमणुका करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार हा फक्त औपचारिक स्वरुपाचा असतो. कारण या बाबतीत त्यांना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच कृती करावी लागते.
- सरन्यायाधीश वगळता अन्य सर्व न्यायाधीशांची नेमणूक करतांना सरन्यायाधीशांचा विचार घेणे राष्ट्रपतीवर बंधनकारक आहे.

## ❖ कार्यकाल –

१) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत राहता येते.
२) कार्यरत असलेल्या न्यायाधीशांचे वेतन व भत्ते कमी करता येत नाहीत.

| वेतन व भत्ते (२०१८ पासून) | |
|---|---|
| सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश – २,५०,००० रु. | उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश - २,५०,००० रु. |
| इतर – २,५०,००० रु. | इतर – २,५०,००० रु. |

## ❖ सर्वोच्च न्यायालय (महाभियोग) :

- न्यायाधीशास, शाबीत झालेली गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या आधारांवर पदावरुन दूर करता येऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास पदावरुन दूर करण्याच्या पद्धतीचे नियमन 'न्यायाधीश चौकशी कायदा, १९६८' अन्वये पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे :

i. पदावरून दूर करण्याच्या प्रस्तावावर लोकसभेच्या बाबतीत किमान १०० सदस्यांनी किंवा राज्यसभेच्या बाबतीत किमान ५० सदस्यांनी सही करून तो अध्यक्ष किंवा सभापतींना सादर करणे गरजेचे असते.

ii. अध्यक्ष / सभापती असा प्रस्ताव स्विकारु शकतात किंवा स्विकारण्यास नकार देऊ शकतात.

iii. प्रस्ताव स्विकारण्यात आल्यास, अध्यक्ष / सभापतींमार्फत न्यायाधीशावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी एका त्रि-सदस्यीय समितीची स्थापना करावी लागते.

iv. या समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असतो.

१. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश किंवा एक न्यायाधीश
२. एखाद्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश
३. एक निष्णात कायदेपंडीत

v. जर समितीच्या चौकशीमध्ये न्यायाधीश गैरवर्तणूक किंवा अक्षमतेच्या कारणावरुन दोषी असल्याचे आढळले, तर सभागृह त्यांना पदावरुन दूर करण्यासाठीचा प्रस्ताव विचारात घेऊ शकते.

vi. जर दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्ताव विशेष बहुमताने संमत झाला तर राष्ट्रपतींकडे न्यायाधीशास पदावरुन दूर करण्याचे समावेदन राष्ट्रपतींना सादर केले जाते. त्यानुसार, राष्ट्रपती न्यायाधीशास पदावरुन दूर करण्याचा आदेश काढतात.

**❖ कार्यार्थ/हंगामी सरन्यायाधीशाची नेमणूक (कलम १२६) (Appointment of acting Chief Justice) :-** भारताच्या सरन्यायाधीशाचे पद रिक्त असेल, किंवा भारताचे सरन्यायाधीश तात्पुरत्या कारणामुळे अनुपस्थित असतील, किंवा भारताचे सरन्यायाधीश आपल्या पदाच्या कर्तव्यांचे पालन करण्यास असमर्थ असतील, तेव्हा राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील एखाद्या न्यायाधीशाची नेमणूक कार्यार्थ / हंगामी सरन्यायाधीश म्हणून करू शकतात.

## ❖ इतर :

- सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश निवृत्त झाल्यास त्यांना देशात कुठेही वकिली करता येत नाही.
- महाभियोगाच्या प्रक्रियेस सामोरे गेलेले न्यायाधीश - जस्टीस रामास्वामी. परंतु लोकसभेत मंजुर झालेला खटला राज्यसभेत मंजूर न झाल्यामुळे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.
- सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाच्या अनुपस्थितीत सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील न्यायाधीश कामे पाहतात.
- सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश व इतर न्यायाधीशांचे वेतन राष्ट्राच्या संचित निधीतून दिले जाते.
- आणीबाणीच्या काळामध्ये राष्ट्रपतींच्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन कपात करण्यात येते.

## ❖ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :-

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र

- प्रारंभिक अधिकार क्षेत्र
- पुनर्निर्णयात्मक अधिकार क्षेत्र (अपील)
- सल्ला विषयक अधिकार क्षेत्र
- न्यायालयीन पुनर्विलोकन
- अभिलेख न्यायालय

## १. प्रारंभिक अधिकार क्षेत्र (कलम १३१) :

- प्रारंभिक क्षेत्रात असे दावे येतात, जे थेट सर्वोच्च न्यायालयातच दाखल केले जातात.
- या प्रारंभिक अधिकार क्षेत्रात खालील विवादांचा समावेश होतो.

### • संघराज्यातील विवादाचे स्वरूप :

संघराज्यातील विवादाचे स्वरुप

- केंद्र व घटक राज्ये विरुद्ध घटक राज्य/ राज्ये
- केंद्र विरुद्ध घटक राज्ये
- केंद्र विरुद्ध एक घटक राज्य
- एक घटक राज्य विरुद्ध दुसरे घटक राज्य
- एक घटक राज्य विरुद्ध अनेक घटक राज्ये

a) दोन घटकराज्यांमधील वाद
b) भारत सरकारविरुद्ध एक किंवा अधिक घटकराज्ये
c) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान निवडणूक विषयक
d) मूलभूत हक्कांच्या संबंधीचे दावे (रिट्स)
e) कायद्याच्या कलमांचा अर्थ लावणे.
f) नद्यांचे पाणी, राज्याच्या सीमा इत्यादी वाद यात अंतर्भूत होत नाहीत. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकीबद्दलचे वाद सर्वोच्च न्यायालयातच दाखल होतात.

## ❖ सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र

- भारताच्या लोकशाही शासनव्यवस्थेत सर्वोच्च न्यायालयाला महत्वाची भूमिका प्रदान करण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालय हे फेडरल न्यायालय आहे, अपिलाचे सर्वोच्च न्यायालय आहे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण आहे. तसेच घटनेचा संरक्षणकर्ता म्हणूनही ते कार्य करते.
- त्यामुळेच, आपली कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडता यावीत म्हणून सर्वोच्च न्यायालयाला कार्यात्मक स्वातंत्र्य प्रदान करणे आवश्यक ठरते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय कार्यकारी व कायदेकारी मंडळांच्या दबाव व हस्तक्षेपापासून मुक्त परिस्थितीत व निर्भय आणि नि:स्पृहपणे आपले कार्य पार पाडण्यास सक्षम ठरेल.
- भारताच्या संघराज्यीय पद्धतीत घटनेच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे म्हणून घटनेत विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत :

१. **नेमणुकीची पद्धत** : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींमार्फत केली जाते. राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने कार्य करतात. मात्र, घटनेमध्ये अशा नेमणुका करतांना राष्ट्रपतींवर सर्वोच्च व उच्च न्यायालयांतील त्यांना आवश्यक वाढतील एवढ्या न्यायाधीशांचा विचार घेण्याचे बंधन टाकले आहे. अशा रितीने, न्यायाधीशांच्या नेमणुकांवरील सरकारचा पुर्णाधिकार कमी करण्यात आला असून त्यातील राजकीय हस्तक्षेप नष्ट करण्यात आला आहे (कलम १२४ (२))

२. **पदावधीची सुरक्षा** : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावधीची सुरक्षा देण्यात आलेली आहे. त्यांची नेमणूक जरी राष्ट्रपतींमार्फत होत असली तरी, ते राष्ट्रपतींच्या मर्जीने पद धारण करीत नाही. त्यांना पदावरून दूर करण्याची पद्धत घटनेत दिलेली आहे, जी एक अवघड प्रक्रिया आहे. (कलम १२४ (४))

३. **निश्चित सेवाशर्ती** : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार, भत्ते, विशेषाधिकार, रजा आणि पेन्शन संसदीय कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित केले जातात. न्यायाधीशाच्या नेमणुकीनंतर वरील बाबींमध्ये त्यांना नुकसानकारक होईल असा बदल (वित्तीय आणीबाणीचा कालावधी वगळता) करता येत नाही. अशा रितीने, त्यांच्या सेवाशर्ती, त्यांच्या पदावधी दरम्यान कायम राहतात. (कलम १२५ (२))

४. **खर्च संचित निधीवर प्रभारित** : सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व सर्व अधिकारी / सेवकांचे पगार, भत्ते व पेन्शन, याचबरोबरच सर्वोच्च न्यायालयाचा सर्व प्रशासकीय खर्च, हा भारताच्या संचित निधीवर प्रभारित असतो. म्हणजेच, त्यावर संसदेत चर्चा होऊ शकते, मात्र मतदान होत नाही. (कलम १४६ (३))

५. **संसदेतील चर्चेवर निर्बंध** : कलम १२१ अन्वये, घटनेने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत संसदेत किंवा राज्य विधिमंडळांमध्ये कोणतीही चर्चा करण्यावर प्रतिबंध घातले आहेत. (अशी चर्चा केवळ त्यांना पदावरून करतेवेळी केली जाऊ शकते)

६. **निवृत्तीनंतर वकिली करण्यावर बंदी** : कलम १२४ (७) अन्वये, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास निवृत्तीनंतर भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर वकिली करण्यास बंदी घालण्यात आली आहे. न्यायाधीशांनी नि:स्पृहपणे काम करावे यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे.

७. **अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार** : कलम १२९ अन्वये, सर्वोच्च न्यायालयाला स्वत:च्या अवमानाबद्दल कोणत्याही व्यक्तीला शिक्षा करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, कोणीही सर्वोच्च न्यायालयाच्या कृती व निर्णयांवर टिका करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा प्राधिकार व सन्मान राखण्यासाठी हा अधिकार देण्यात आला आहे.

८. **आपल्या स्टाफची नेमणूक करण्याचे स्वातंत्र्य** : भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांची व सेवकांची नेमणूक कार्यकारी मंडळाच्या कोणत्याही हस्तक्षेपाविना करू शकतात. ते त्यांच्या सेवाशर्तीसुद्धा निश्चित करु शकतात.

९. **त्याचे अधिकारक्षेत्र घटविता येत नाही** : संसदेला सर्वोच्च न्यायालयांचे अधिकार क्षेत्र व अधिकार घटविण्याचा अधिकार नाही. घटनेनेच सर्वोच्च न्यायालयाला विविध प्रकारची अधिकारक्षेत्रे प्रदान केलेली आहेत. संसद या अधिकार क्षेत्रात घट घडवून आणू शकत नाही, मात्र त्यात वाढ घडवून आणू शकते.

१०. **कार्यकारी मंडळापासून विभक्त** : घटनेने राज्यसंस्थेला लोकसेवांमध्ये न्यायव्यवस्था न्यायव्यवस्था कार्यकारी मंडळापासून विभक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. (कलम ५०) म्हणजेच, कार्यकारी अधिकाऱ्यांना न्यायिक अधिकार असू नयेत. त्यामुळे आज कार्यकारी प्राधिकाऱ्यांची न्यायिक प्रशासनातील भूमिका संपुष्टात आणण्यात आली आहे.

## २. न्यायिक पूनर्विलोकन (Judicial Review) :

- सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आपल्या स्वत:च्या निर्णयावर फेरविचार करून ते बदलवू शकतात.
- कायदेमंडळाने संमत केलेले कायदे जर मूलभूत हक्कांचा भंग करणारे असतील तर सर्वोच्च न्यायालयाकडून त्यास घटनाबाह्य घोषित केले जाते व ती कृती रद्द केली जाते. यालाच न्यायिक पुनर्विलोकन म्हणतात.
- कलम १३७ अन्वये पूनर्निर्णयाचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला मिळाले आहेत. पूननिर्णयात्मक अधिकारक्षेत्राचे दोन भाग पडतात.

१. संविधानाचा अर्थ लावण्यासंबंधीचे दावे    २. निर्णय व आदेश यांचे पुनर्विलोकन

### ❖ संविधानाचा अर्थ लावण्यासंबधीचे दावे :-

- उच्च न्यायालयाने एखाद्या दिवाणी किंवा फौजदारी खटल्यात दिलेल्या निकालात घटनेच्या अर्थासंबंधी कायदेशीर प्रश्न असेल तर सर्वोच्च न्यायलयात अपील करता येते. संविधानिक दावे खालील ३ प्रकारचे असतात :-

अ) दिवाणी दावे    ब) फौजदारी दावे    क) खास दावे

### अ) दिवाणी दावे:-

- उच्च न्यायालयाच्या दिवाणी खटल्यासंबधीच्या निर्णयावरुन सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. यासाठी दिवाणी दाव्यांची किंमत २० हजार रुपयांपेक्षा अधिक असावी. शिवाय दिवाणी हक्कासंबधी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असावा.

### ब) फौजदारी दावे:-

- खालील प्रकारच्या फौजदारी दाव्यात सर्वोच्च न्यायालयाकडे पुनर्निर्णयासाठी अर्ज करता येतो.
  - i. उच्च न्यायालयापुढे पुनर्निर्णयासाठी आलेल्या वादात कनिष्ठ न्यायालयाने एखाद्या आरोपीस निर्दोष सोडून दिले असल्यास किंवा उच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली असल्यास.
  - ii. सर्वोच्च न्यायालयापुढे पुनर्निर्णयासाठी वाद पाठविणे आवश्यक आहे, असे उच्च न्यायालयाने प्रमाणित केले असल्यास.
  - iii. कनिष्ठ न्यायालयाकडून खटला काढून घेऊन उच्च न्यायालयाने एखाद्या आरोपीस फाशीची शिक्षा दिली असल्यास.

### क) खास दावे:-

- सर्वोच्च न्यायालय भारतातील कोणत्याही न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द पुनर्निर्णयासाठी अर्ज करण्याची विशेष अनुमती देते.

## ३. सल्लाविषयक अधिकारक्षेत्र :-

- कलम १४३ अन्वये भारताचे राष्ट्रपती आवश्यकतेनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे कायदेशीर सल्ला मागू शकतात. उदा. घटनेची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वी झालेले करार किंवा संधी इत्यादी विषयी निर्माण झालेले मतभेद.

## ४. अभिलेख कार्य (कलम १२९) :

- अभिलेख या शब्दाचा अर्थ म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय याचे रुपांतर आपोआप कायद्यात होते.
- कोणत्याही कोर्टात सर्वोच्च न्यायालयाचे रेकॉर्ड दाखल केल्याबरोबर त्यांना प्रत्यक्ष पुरावा मानला जातो.
- आधीच्या निर्णयांचा पुढील खटल्यांमध्ये घेतला जाऊ शकतो.
- सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर त्याखालची न्यायालये टीका टिप्पणी करु शकत नाही. तो न्यायालयाचा अपमान समजला जातो.

## ४. पर्यवेक्षणाचे अधिकार :

- सर्वोच्च न्यायालयाला उच्च न्यायालये व कनिष्ठ न्यायालये यांच्या कामकाजावर पर्यवेक्षण करण्याचा अधिकार असतो.
- कलम १४३ नुसार राष्ट्रपती एखाद्या कायद्याच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागू शकतात. सर्वोच्च न्यायालयावर सल्ला देण्याचे बंधन नसते. तसेच सुनवाई कशा पद्धतीची राहील हे देखील सर्वोच्च न्यायालय ठरवू शकतो.
- सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय बदलण्याचा अधिकार त्याच न्यायालयाला आहे. याला stane decisis म्हणतात.
- सर्वोच्च न्यायालयातील न्यायालयीन व्यवस्थेचा सर्व खर्च संचित निधीतून होतो. त्यावर संसदेला मतदान करता येत नाही. याचाच अर्थ न्यायालयाच्या कारभारात संसद किंवा शासन हस्तक्षेप करु शकत नाही.
- कलम ३२१ अनुसार जिल्हा न्यायाधीश किंवा त्याहीपेक्षा वरच्या दर्जाच्या न्यायाधीशांची अखिल भारतीय सेवा संसद स्थापन करू शकते. पूर्वी दिलेल्या निर्णयावर महत्वपूर्ण बदल करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे.
- कलम १३६ अनुसार सर्वोच्च न्यायालयाला कोणत्याही केसमध्ये मग ती दिवाणी असो किंवा फौजदारी असो, विशेष परवानगी देऊन कोणत्याही न्यायालयाने दिलेला निकाल, शिक्षा, हुकूम यावर पूनर्निर्णय देता येतो.

## ❖ घटनेतील विविध कलमांचा अर्थ लावण्यासाठी विचारात घेतलेले सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वपूर्ण निर्णय :

### ❑ शंकरी प्रसाद विरुद्ध भारत सरकार (१९५२) :

- या खटल्यामध्ये पहिल्या घटनादुरुस्ती कायद्याला (१९५१) आव्हान दिले गेले. मुलभूत अधिकारांचे उल्लंघन करणे याद्वारे शासनाला नागरिकांच्या मुलभुत हक्कांवर मर्यादा आणण्याचा अधिकार बहाल केला गेला. तसेच कलम १३ (२) नुसार कायद्याच्या घटनादुरुस्तीचाही समावेश होतो, असा युक्तीवाद करण्यात आला.
- परंतु न्यायालयाने हा युक्तीवाद अमान्य केला. कलम ३६८ नुसार पुरवण्यात आलेल्या संसदेच्या घटनादुरुस्ती अधिकारात मूलभूत हक्कांत दुरुस्ती करण्याचा अधिकार अंतर्भूत होतो. कलम १३ (२) मध्ये कायद्याच्या व्याख्येत संसदीय कायद्यांचा समावेश होतो. परंतु घटनात्मक कायद्याचा (घटनादुरुस्ती) समावेश होत नाही.
- वरील प्रकारे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देऊन संसदेच्या घटनादुरुस्तीचा अधिभार मान्य केला व संसदेने केलेली पहिली घटनादुरुस्ती वैध ठरली.

### ❑ बेला बॅनर्जी खटला (१९५४) :

- या खटल्यात शासनाने मालमत्ता ताब्यात घेतल्यानंतर दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईच्या न्याय्यतेचा प्रश्न उपस्थित केला व शासन नागरिकांची मालमत्ता ताब्यात घेऊ शकते; पण त्या मोबदल्यात जी भरपाई दिली जाते ती अवाजवी असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की शासनाद्वारे दिली जाणारी नुकसान भरपाई ही न्याय व बाजारभावाप्रमाणे असावी. यामुळे शासनाच्या अधिकारावर मर्यादा आल्या.

### ❑ सज्जन सिंह विरुद्ध राजस्थान सरकार (१९५६) : 
या खटल्यात १७ व्या घटनादुरुस्ती कायद्याला आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने याचा निर्णय देताना शंकरीप्रसाद खटल्यातील निर्णयाचा पुनरुच्चार केला.

### ❑ गोलखनाथ विरुद्ध पंजाब सरकार (१९६७) :

- यात सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा केला की मूलभूत अधिकारात घटनादुरुस्ती करण्याचा संसदेला अधिकार नाही.
- सर्वोच्च न्यायालयावर आधी दिलेले निर्णय बंधनकारक नाहीत.
- कलम ३६८ केवळ घटनादुरुस्तीची प्रक्रिया दाखवते, क्षेत्र नाही.
- पंजाब राज्यातील गोलखनाथची ४१८ हेक्टर जमीन त्याच्या मृत्युनंतर अतिरिक्त जमीन असल्याचे घोषित करून पंजाब शासनाने ती ताब्यात घेतली. त्यामुळे गोरखनाथ यांच्या आप्तेष्टांना शासनाची ही वृत्ती कलम १४,१९ द्वारा पुरवण्यात आलेला मुलभूत अधिकार हिरावून घेतात, असा युक्तिवाद केला व पहिल्या, चौथ्या व सातव्या घटनादुरुस्तीना आव्हान देण्यात आले. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुलगामी स्वरुपाचा निकाल देऊन संसदेच्या केवळ मुलभुत अधिकार अपरिवर्तनीय व पवित्र आहेत.

### ❑ केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार (१९७३) :

- या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने, गोलखनाथ विरुद्ध पंजाब सरकार या दिलेल्या निकालाच्या विरुद्ध निकाल दिला.
- संसद घटनादुरुस्ती करू शकते, पण घटनेच्या मूळ चौकटीला बदलण्याचे अधिकार संसदेला नाहीत.

### ❑ मेनका गांधी प्रकरण (१९७८) :

- १९६७ च्या पारपत्र कायद्याच्या आधारे मेनका गांधी यांचे पारपत्र सार्वजनिक हिताचे कारण सांगून रद्द करण्यात आले व मेनका गांधी यांनी संबंधित अधिकारांची कृती राज्यघटनेद्वारा नागरिक म्हणून कलम १४, १९, २१ यांच्याद्वारे दिलेल्या समता, संचार व व्यक्तीगत स्वातंत्र्याचा संकोच करते असा युक्तीवाद मांडला.
- सर्वोच्च न्यायालयाने पारपत्र अधिकाऱ्याची कृती अवैध ठरवली. कलम २१ द्वारे पुरवण्यात आलेल्या व्यक्तीगत स्वातंत्र्याची व्याप्ती वाढली. न्यायालयाने हे स्पष्ट केले की, जीवित व व्यक्तीगत स्वातंत्र्य म्हणजे प्रतिज्ञापुर्वक जीवन जगण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे कायद्याची प्रक्रिया ही नैसर्गिक न्यायाची हमी देणारी असली पाहिजे, केवळ वैध असावी

### ❑ मिनर्वा मिल विरुद्ध भारत सरकार (१९८०) : 
मूलभूत हक्क राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वापेक्षा श्रेष्ठ आहेत.

### ❑ इंदिरा साहनी विरुद्ध भारत सरकार खटला (१९९२) :

- तामिळनाडूमध्ये १९९२ मध्ये अनुसूचित जातींसाठी १८ टक्के, अनुसूचित जमातींसाठी १ टक्के, इतर मागासवर्गीयांसाठी ५० टक्के अशा एकूण ६९ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्यासंबंधी खटल्याचा निकाल देताना १६ नोव्हेंबर १९९२ रोजी कोणत्याही परिस्थितीत राखीव जागांचे प्रमाण कलम १६(४), अन्वये ५० टक्के पेक्षा अधिक नसावे, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. कलम १६ (४) मध्ये नमुद केलेल्या मागास नागरिकांचा वर्ग हा केवळ जातीच्या आधारे नाही तर आर्थिक आधारे निर्धारित केला जावा, तसेच क्रिमीलेअर घटकाला आरक्षणातून वगळण्यात यावे, आरक्षणाने ५० टक्केची परिसीमा ओलांडू नये, बढत्यांमध्ये आरक्षण दिले जाणार नाही.

i. **इंदिरा गांधी विरुद्ध राजनारायण खटला :**

- या खटल्यात ३९ व्या घटनादुरुस्तीन्वये ३२९ कलमात केलेली दुरुस्ती घटनाबाह्य असल्याचे व ती मूलभूत संरचनेचा भंग करत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. यानंतर २६ जून १९७५ ची आणीबाणी १९७७ पर्यंत भारतात होती.

# उच्च न्यायालय



- **उच्च न्यायालय (२१४) :** भारतात सर्वप्रथम १८६२ साली कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास या प्रांतांमध्ये उच्च न्यायालयांची स्थापना करण्यात आली. १८६६ साली चौथे उच्च न्यायालय अलाहाबाद येथे स्थापन करण्यात आले. १९५० नंतर ब्रिटिश प्रांतातील उच्च न्यायालये संबंधित घटकराज्यातील उच्च न्यायालये बनली. राज्यघटनेने प्रत्येक घटकराज्यासाठी एका उच्च न्यायालयाची तरतूद केलेली होती. परंतु १९५६ सालच्या ७ व्या घटनादुरुस्तीने दोन किंवा अधिक घटकराज्ये आणि दोन वा अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यासाठी सामाईकपणे उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार भारतीय संसदेला देण्यात आलेला आहे. न्यायालयाचे भौगोलिक अधिकार क्षेत्र हे त्या राज्याच्या भूसीमांशी संलग्न करते.
- सध्या भारतामध्ये २१ उच्च न्यायालये आहेत. त्यापैकी तीन न्यायालये सामाईक आहेत. दिल्लीसाठी स्वतंत्र असे उच्च न्यायालय आहे. इतर केंद्रशासित प्रदेश हे घटकराज्याच्या न्यायाधिकार क्षेत्रात येतात. राज्यघटनेतील सहाव्या भागामध्ये कलम २१४ ते कलम २३१ मध्ये उच्च न्यायालयांची रचना, स्वातंत्र्य, अधिकार क्षेत्र, अधिकार, कार्यपद्धती आणि तद्नुषंगिक बाबी नमुद केलेल्या आहेत.
- **तरतूद** - घटनेच्या कलम २१४ या कलमानुसार प्रत्येक घटकराज्य किंवा अनेक घटकराज्य मिळून एक उच्च न्यायालय असावे तशी तरतूद करण्यात आली आहे.
- भारतात सध्या २५ उच्च न्यायालये आहेत. लहान राज्यात दोन, तीन राज्ये मिळून एका उच्च न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आहे.
- **उदा.** : १.मुंबई व गोवा - मुंबई उच्च न्यायालय  २.पंजाब व हरियाणा - चंदीगढ उच्च न्यायालय

| | |
|---|---|
| २१४ | राज्यांसाठी उच्च न्यायालये |
| २१५ | उच्च न्यायालये ही अभिलेख न्यायालये |
| २१६ | उच्च न्यायालयांची घटना |
| २१७ | उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांची नियुक्ती व त्या पदाच्या शर्ती |
| २१८ | सर्वोच्च न्यायालयासंबंधीचे विवक्षित उपबंध उच्च न्यायालयांना लागू असणे. |
| २१९ | उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशानी शपथ घेणे किंवा दृढकथन करणे. |
| २२० | न्यायाधीश झाल्यानंतर व्यावसायावर निर्बंध |
| २२१ | न्यायाधीशाचे पगार, इत्यादी |
| २२२ | न्यायाधीशाची एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली |
| २२३ | कार्यार्थ मुख्य न्यायमुर्तीची नियुक्ती |
| २२४ | अतिरिक्त व कार्यार्थ न्यायाधीशांची नियुक्ती |
| २२४ अ | उच्च न्यायालयांच्या बैठकीसाठी निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती |
| २२५ | विद्यमान उच्च न्यायालयांची अधिकारिता |
| २२६ | प्राधिलेख काढण्याची उच्च न्यायालयांची शक्ती |
| २३१ | दोन किंवा अधिक राज्यांसाठी एक सामाईक उच्च न्यायालयाची स्थापना |

## ❖ रचना :

- एक मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. इतर न्यायाधीशांची संख्या ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.
- मुंबई उच्च न्यायालयात सध्या ७५ न्यायाधीश आहेत. (दि. १ जुन २०१७ पासून)

**❖ नेमणूक :** राष्ट्रपतीद्वारे मुख्यन्यायाधीशाची नेमणूक केली जाते व त्याचबरोबर इतर न्यायाधीशांची नेमणूक सुद्धा राष्ट्रपतीच करतात पण राज्यपाल व मुख्यन्यायाधीशांच्या सल्ल्याने.

**❖ शपथ :** उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश राज्यपालासमोर शपथ घेतात.

## ❖ पात्रता :

- पाच वर्षे जिल्हा न्यायालयात न्यायाधीश किंवा दहा वर्षे उच्च न्यायालयात वकीली केलेली असावी.
- न्यायिक पदावर काम करण्याचा किमान १० वर्षाचा अनुभव किंवा दहा वर्षे उच्च न्यायालयात वकिलीचा अनुभव. सर्वसाधारणपणे निम्म्या न्यायाधीशांची नेमणूक कनिष्ठ न्यायालयातील ज्येष्ठ न्यायाधीशांमधून आणि निम्मे न्यायाधीश वकीलांमधून करतात.

**❖ कार्यकाल :** वयाची ६२ वर्षापर्यंत तो पदावर राहू शकतो. राजीनामा दिल्यास अथवा इतर राज्यात बदली झाल्यास किंवा सर्वोच्च न्यायालयात बढती मिळाल्यास हे पद रिक्त होते. महाराष्ट्रातील उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश – मोहीत शहा, सध्या ६५ न्यायाधीश, ३ खंडपीठे - औरंगाबाद, नागपूर, पणजी.

## ❖ बडतर्फी :

- अकार्यक्षमता व पदाचा गैरवापर त्याचबरोबर घटनाबाह्य व कायदाविरोधी वर्तन या कारणामुळे त्यांच्यावर संसदेत महाभियोग चालवला जातो. राष्ट्रपतींच्या आदेशाने उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना बडतर्फ केले जाते. राष्ट्रपती बडतर्फीचा असा आदेश केवळ संसदेने शिफारस केल्यानंतरच काढू शकतात. त्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताची गरज असते. म्हणजेच त्या सभागृहातील एकूण सदस्यसंख्येचे बहुमत आणि त्या सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी २/३ सदस्यांचे बहुमत सिद्ध झालेली गैरवर्तवणूक किंवा अकार्यक्षमता या दोन आधारे त्याला बडतर्फ केले जाऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच आणि त्याच आधारे उच्च न्यायाधीशांची बडतर्फी केली जाते.
- १९६८ सालच्या न्यायाधीशांची चौकशी कायद्यान्वये उच्च न्यायालयातील न्यायाधीशाच्या बडतर्फीची प्रक्रिया महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारा नियंत्रित करण्यात आलेली आहे.

१. बडतर्फीच्या ठरावावर लोकसभेतील १०० सदस्यांनी आणि राज्यसभेतील ५० सदस्यांनी सह्या करुन तो ठराव सभापती / अध्यक्षांकडे द्यावा लागतो.
२. सभापती / अध्यक्ष हा प्रस्ताव दाखल करुन घेतात किंवा नाकारतात.
३. प्रस्ताव दाखल करून घेतल्यावर सभापती / अध्यक्ष आरोपांची चौकशी करण्यासाठी एक तीन सदस्यीय समिती स्थापन करतात.
४. या समितीमध्ये - सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा एक तृतीयांश, उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश आणि विशेष प्राविण्य असलेले न्यायमूर्ती यांचा समावेश असतो.
५. संबंधित न्यायाधीशाची गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाली तर बडतर्फीचा प्रस्ताव संसद विचारार्थ घेते.
६. दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताद्वारे प्रस्ताव संमत केला तर तो ठराव राष्ट्रपतींकडे पाठविला जातो.
७. शेवटी संबंधित न्यायाधीशाला बडतर्फ करण्याचा आदेश.

## ❖ महाभियोगाची प्रक्रिया (उच्च न्यायालय) :

- १९६८ सालच्या न्यायाधीश चौकशी कायद्यान्वये उच्च न्यायालयातील न्यायाधीशाच्या बडतर्फीची प्रक्रिया महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारा नियंत्रित करण्यात आलेली आहे.

१. बडतर्फीच्या ठरावावर लोकसभेतील १०० सदस्यांनी आणि राज्यसभेतील ५० सदस्यांनी सह्या करून तो ठराव सभापती /अध्यक्षांकडे द्यावा लागतो.
२. सभापती / अध्यक्ष हा प्रस्ताव दाखल करून घेतात किंवा नाकारतात.
३. प्रस्ताव दाखल करुन घेतल्यावर सभापती / अध्यक्ष आरोपांची चौकशी करण्यासाठी एक तीन सदस्यीय समिती स्थापन करतात.
४. या समितीमध्ये - सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश कोणत्याही उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश आणि विशेष प्राविण्य असलेले वकील यांचा समावेश असतो.
५. संबंधित न्यायाधीशाची गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाली तर बडतर्फीचा प्रस्ताव संसद विचारार्थ घेते.
६. दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताद्वारे प्रस्ताव संमत केला तर तो ठराव राष्ट्रपतींकडे पाठविला जातो.
७. शेवटी संबंधित न्यायाधीशाला बडतर्फ करण्याचा आदेश.

## ❖ वेतन : राज्याच्या संचित निधीतून दिले जाते. आणीबाणीच्या वेळी राष्ट्रपतीद्वारे त्यांचे वेतन कपात केले जाते.

## ❖ इतर :

१. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना ज्या राज्यात त्यांनी न्यायदानाचे काम केले त्या राज्यात वकिली करता येत नाही. तसेच ते सर्वोच्च न्यायालयात वकिली करू शकत नाही.उच्च न्यायालयातून सेवा निवृत्त झाल्यावर एखाद्या न्यायाधीशाला सरकारी पदावर नेमायचे असल्यास उदा. चौकशी आयोग, त्यासाठी राष्ट्रपतीची संमती द्यावी लागते.
२. शेरीफ कनिष्ठ कोर्टाचे कारकून, अधिकारी, वकीलमंडळी यांनी आकारायची फी उच्च न्यायालय ठरवतो.

## ❖ उच्च न्यायालय : अभिलेख न्यायालय :-

- उच्च न्यायालय हे देखील सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे अभिलेख न्यायालय आहे.
- उच्च न्यायालयाच्या रेकॉर्डला राज्यात इतर सर्व कनिष्ठ न्यायालयात सिद्ध झालेला पुरावा मानतात. त्याविरुद्ध हरकत घेता येत नाही.
- घेतल्यास तो न्यायालयाचा अपमान ठरतो व तसे करणाऱ्यास शिक्षा देण्याचा अधिकार उच्च न्यायालयात आहे.उच्च न्यायालयाचे निर्णय इतर सर्व कनिष्ठ कोर्टावर बंधनकारक आहेत.

## ❖ उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :-

**उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र**

- प्रारंभिक अधिकार क्षेत्र
- प्रादेशिक अधिकार क्षेत्र
- पुनर्निर्णयात्मक अधिकार क्षेत्र (अपील)
- अभिलेख न्यायालय
- कनिष्ठ न्यायालयावर पर्यवेक्षणाचा अधिकार व नियंत्रणाचा अधिकार


**उच्च न्यायालयाचे अधिकार**

| प्रादेशिक अधिकार | प्रारंभिक अधिकार | पूनर्निर्णयाचा अधिकार | कनिष्ठ न्यायालयावर देखरेख |
|---|---|---|---|
| उच्च न्यायालयात त्याच राज्यातील खटल्या संदर्भात निकाल देण्याचे अधिकार आहेत. | मुलभूत हक्कांसंदर्भातील वाद राज्याच्या निवडणूका संदर्भातील वाद (विधानसभा, लोकसभा) घटनात्मक उपाययोजना संदर्भातील वाद (पाच न्यायाधीशांचे एक विशिष्ट खंडपीठ असते जे एखाद्या ठिकाणी घटनात्मक उपाययोजना संदर्भात दावा दाखल झाला असेल तर तो या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर निकाली काढला जातो.) | कनिष्ठ न्यायालयाने (जिल्हा न्यायालयाने) दिलेला निर्णय बदलण्याचे अधिकार उच्च न्यायालयास आहेत. | कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणूका, त्यांच्या रजा, बढत्या, पदावरुन काढून टाकणे, वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना करणे, एखाद्या ठिकाणी कनिष्ठ न्यायालयाची निर्मिती, कनिष्ठ न्यायालयातून खटला काढून इतर न्यायालयात वर्ग देणे अथवा स्वत: कडे घेणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अलाहाबाद (१८६६) | उत्तरप्रदेश | अलाहाबाद (खंडपीठ : लखनौ) |
| २ | **तेलंगाना** (१९५४) | **तेलंगाना** | |
| ३ | बॉम्बे (१८६२) | महाराष्ट्र, दादरा नगर हवेली, गोवा व दमण आणि दीव | मुंबई (खंडपीठे : नागपूर, पणजी आणि औरंगाबाद) |
| ४ | कलकत्ता (१८६२) | पश्चिम बंगाल आणि अंदमान निकोबार बेट | कलकत्ता (मंडळ खंडपीठ : पोर्ट ब्लेअर) |
| ५ | छत्तीसगढ (२०००) | बिलासपूर | छत्तीसगढ |
| ६ | दिल्ली (१९६६) | दिल्ली | दिल्ली |
| ७ | गुवाहाटी (१९४८) | आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम आणि अरूणाचल प्रदेश | गुवाहाटी (खंडपीठ : इम्फाळ, आगरतळा, आणि शिलाँग) |
| ८ | गुजरात (१९६०) | गुजरात | अहमदाबाद |
| ९ | हिमाचल प्रदेश (१९७१) | हिमाचल प्रदेश | शिमला |
| १० | जम्मू (१९५७) | जम्मू आणि **लदाख** | श्रीनगर आणि जम्मू |
| ११ | झारखंड (२०००) | झारखंड | रांची |
| १२ | कर्नाटक (१८८४) | कर्नाटक | बंगळूर |
| १३ | केरळ (१९५६) | केरळ आणि लक्षद्वीप | एर्नाकुलम |
| १४ | मध्यप्रदेश (१९५६) | मध्यप्रदेश | जबलपूर (खंडपीठ : ग्वाल्हेर आणि इंदौर) |
| १५ | मद्रास (१८६२) | तामिळनाडू आणि पाँडेचरी | चेन्नई |
| १६ | ओरिसा (१९४८) | ओरिसा | कटक |
| १७ | पटना (१९१६) | बिहार | पटना (खंडपीठ :रांची) |
| १८ | पंजाब आणि हरियाणा (१९६६) | पंजाब, हरियाणा आणि चंदीगढ | चंदीगढ |
| १९ | राज्यस्थान (१९५०) | राज्यस्थान | जोधपूर (खंडपीठ : जयपूर) |
| २० | सिक्कीम (१९७५) | सिक्कीम | गंगटोक |
| २१ | उत्तरांचल (२०००) | उत्तरांचल | नैनिताल |
| २२ | मणिपूर (२०१३) | मणिपूर | इंफाळ |
| २३ | मेघालय (२०१३) | मेघालय | शिलाँग |
| २४ | त्रिपुरा (२०१३) | त्रिपुरा | आगरतळा |
| २५ | **आंध्रप्रदेश** | **आंध्रप्रदेश** | |

## ❖ दुय्यम न्यायालयाची रचना :

- उच्च न्यायालयानंतर जिल्हा आणि तालुका स्तरावर दुय्यम किंवा कनिष्ठ न्यायालये असतात. भारताच्या राज्यघटनेत दुय्यम न्यायालयासंबंधी काही तरतुदी दिलेल्या आहेत. या तरतुदी जिल्हा न्यायालयाशी संबंधित आहेत.
- न्यायिक सत्ता आणि कार्यकारी सत्ता यांची एकमेकांपासून फारकत करणे हे घटनाकर्त्यांचे उद्दिष्ट होते. त्याचबरोबर न्यायविषयक बाबतीत सामान्य जनतेचा जास्त संबंध कनिष्ठ स्तरावरील न्यायालयांशी येतो. जनतेला न्यायदानाच्या कार्याबद्दल आणि निष्पक्षपातीपणाबद्दल विश्वास वाटावा याची जबाबदारी घेणे घटनाकर्त्यांना महत्वाचे वाटते. त्या उद्देशाने दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका, पात्रतेच्या अटी यासंबंधीच्या तरतुदी घटनेमध्येच करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर उच्च न्यायालयाला या न्यायालयांवर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.




# जिल्हा न्यायालय

## ❖ नेमणूक : राज्यपाल जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करतात.

- जिल्हा न्यायाधीश निवडत असताना राज्यपाल उच्च न्यायालयाच्या मुख्यन्यायाधीशांचा सल्ला घेतो.

### ❑ P.D.J. (Principle District Judge) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश :-

- **पात्रता :** त्याने जिल्हा न्यायालयात ७ वर्षे वकिली केलेली असावी किंवा न्यायिक कामाचा अनुभव असावा. तो आधीपासून केंद्र किंवा राज्य शासनाच्या सेवेत नसावा. उच्च न्यायालयाने नेमणुकीसाठी त्याची शिफारस केलेली असावी
- **इतर दुय्यम न्यायाधीशांच्या नेमणूका** : इतर दुय्यम न्यायाधीशांच्या नेमणूका राज्यपालाच करतो. या नेमणुका करताना लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झालेल्या उमेदवारांची यादी उच्च न्यायालयाकडे पाठवली जाते व त्यातून राज्यपाल नियुक्त करतात.

## ❖ बडतर्फी : राज्यपाल उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने जिल्हा न्यायाधीश व इतर न्यायाधीशांची बडतर्फी करतात.

## ❖ जिल्हा न्यायालयाचे अधिकार :-

- जिल्हा सत्र न्यायालय एखाद्या गंभीर गुन्ह्यामध्ये फाशीची शिक्षा देऊ शकते.
- द्वितीय श्रेणी फौजदारी न्यायालय दोन वर्षे सक्त मजूरी व १००० रु. दंड
- जिल्हा न्यायाधीशांना न्यायिक अधिकारांबरोबरच प्रशासकीय अधिकारही प्राप्त आहेत.
- तसेच त्यांना जिल्ह्यातील सर्व अधिनस्त न्यायालयांवर पर्यवेक्षणात्मक अधिकार आहेत.
- जिल्हा न्यायाधीशांना सर्व न्यायालयाच्या संमतीच्या अधीन आहे, दोषी व्यक्तीने अपील केलेली असो किंवा नसो.
- त्यांनी दिलेल्या निर्णयांविरुद्ध न्यायालयात अपील करता येते.

## ❖ राजस्व न्यायालय (Revenue Court) (महसूल न्यायालय) :

भूमीकर व इतर करावरील खटले चालवण्यासाठी राजस्व न्यायालय आहे. यात सर्वात खालचे न्यायालय तहसीलदाराचे न्यायालय आहे. नायब तहसीलदार – तहसीलदार – जिल्हाधिकारी - आयुक्त – जिल्हा न्यायालय

## ❖ दुय्यम न्यायालयाची रचना :

### ❑ दिवाणी न्यायालय व त्याची कार्ये :

- राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या सल्ल्याने राज्यपाल जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करत असतात.
- जिल्हा न्यायालयाला प्रारंभिक तसेच पुनर्निर्णयाचे अधिकार असतात.
- मालमत्तेचे विवाद, विवाह आणि घटस्फोट, दिवाळखोरी आणि अल्पवयीन मुलांचे पालकत्त्व, बौद्धिक संपदा अधिकार अशा खटल्यांची सुनावणी जिल्हा न्यायाधीश करतात.
- उपन्यायाधीशांच्या (Sub-Judges) आणि 'मुन्सिफ' न्यायालयांच्या निर्णयाविरूद्धच्या याचिकांचीही येथे सुनावणी केली जाते.
- जिल्हा न्यायाधीशांच्याखाली प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग आणि तृतीय वर्ग दिवाणी न्यायालये अशी तीन प्रकारची दुय्यम दिवाणी न्यायालये असतात.

## ❑ फौजदारी न्यायालय :
- ज्या न्यायालयांमध्ये फौजदारी खटले चालवले जातात त्यांना फौजदारी न्यायालये किंवा सत्र न्यायालये असे म्हणतात.
- यात खून, दरोडेखोरी, चोरी इ. प्रकारचे खटले चालतात.
- सत्र न्यायाधीशांच्याखाली प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी व तृतीय श्रेणी दंडधिकारी अशी तीन प्रकारची दुय्यम फौजदारी न्यायालये असतात.
- द्वितीय आणि तृतीय श्रेणी दंडाधिकाऱ्यांकडे पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र नाही.

## ❑ महसूल न्यायालय :
- प्रत्येक जिल्ह्यात महसूल न्यायालयांची स्वतंत्र यंत्रणा असते.
- तहसीलदाराचे न्यायालय हे सर्वात खालच्या पातळीवरील न्यायालय होय.
- त्यांना जमीन महसुलाची वसुली आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबी यांच्या विषयीचे खटले हाताळण्याचा अधिकार असतो.

## ❑ लोक अदालत / लोक न्यायालये :
- १९८६ मध्ये मुख्य न्यायाधीश, राज्यांचे मुख्यमंत्री आणि कायदामंत्री यांच्या परिषदेमध्ये, न्यायदानामधील विलंब दूर करण्यासाठी आणि न्यायालयातील प्रलंबित खटले वेगाने निकालात काढण्यासाठी लोक अदालत (लोक न्यायालय) स्थापन करण्याचा निर्णय झाला
- दिवाणी आणि फौजदारी न्यायालयांव्यतिरिक्त औद्योगिक न्यायालय, सहकार न्यायालय, कुटुंब न्यायालय इ. न्यायालये असतात. मात्र त्यांचे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते मर्यादित असतात.

## ❑ ग्राहक न्यायालये :
- संकल्पना – पी. एन. भगवती
- ग्राहक व विक्रेते यांच्यामधील विवाद आणि तक्रारी निवारण करण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या न्यायालयाला 'ग्राहक न्यायालय' असे म्हणतात. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सरकारने निर्माण केलेली ही न्यायसदृश यंत्रणा आहे.
- 'ग्राहक संरक्षण कायदा – १९८६' नुसार ग्राहकाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक त्रिस्तरीय प्रणाली उभारण्यात आली.
  १.राष्ट्रीय आयोग
  २.राज्य आयोग
  ३.जिल्हा मंच
- मोफत सेवा, वैयक्तिक कराराच्या सेवा आणि शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय सेवांचा अपवाद वगळता इतर सर्व वस्तू व सेवांच्या बाबतीत कोणत्याही ग्राहकाला वरील यंत्रणेकडे तक्रार नोंदविण्याचा अधिकार आहे. ग्राहक संरक्षण कायदा १९८६, जम्मू आणि काश्मिर राज्य वगळता संपूर्ण भारताला लागू आहे. सर्वोच्च न्यायालय हे ग्राहक तक्रारीच्या अपीलाचे अंतिम न्यायालय आहे.

## ❑ बाल गुन्हेगारी न्यायालये :
- कोणताही गुन्हा किंवा अपराध दाखल झालेल्या ७ ते १७ वर्षे वयाच्या बालकांवरील खटले चालविणाऱ्या लवादास बाल गुन्हेगारी न्यायालय असे म्हणतात. बाल गुन्हेगारी न्यायालय 'बाल न्याय कायदा २०००' नुसार काम करते. गुन्हा केलेली मुले, घरातून पळून गेलेली मुले, अनाथ मुले, भीक मागणारी मुले, घर सोडून गुन्हेगारीकडे वळलेली मुले यांच्या बाबतचे खटले या न्यायालयात चालविले जातात. या मुलांना काळजी, सुरक्षा आणि पुनर्वसनाची गरज असते, हे लक्षात घेऊन बाल गुन्हेगारी न्यायालय, बाल न्याय कायद्यानुसार मुलांचे हक्क सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करते.

## ❑ कामगार न्यायालय (Labour Court) :
- उद्योगधंद्यात काम करणाऱ्या श्रमिक कामगारांच्या वादासाठी अशी न्यायालये उभारली आहेत.
- यामध्ये प्रामुख्याने मालक व मजूर यामधील वाद चालवले जातात.
- उदा. नुकसान भरपाईचा वाद

## ❑ कुटुंब न्यायालये (Family Court) :
- महाराष्ट्रात 'कुटुंब न्यायालये कायदा, १९८४' अन्वये कुटुंब न्यायालये स्थापना करण्यात आली आहेत. या न्यायालयांमध्ये विवाह व कुटुंबविषयक तंटे (घटस्फोट, पोटगी, मुलांचे पालकत्व, मालमत्तेचे मालकी इत्यादी) सोडविले जातात. त्यांच्या निकालाविरुद्ध अपील उच्च न्यायालयात करता येते.
- महाराष्ट्रातील पहिले कुटुंब न्यायालय पुणे येथे १९८८ मध्ये, तर त्यानंतर मुंबई येथे १९८९ मध्ये स्थापन करण्यात आले. सध्या महाराष्ट्रात १६ कुटुंब न्यायालये आहेत : ७ मुंबईत, ५ पुण्यात, २ औरंगाबादमध्ये, तर २ नागपूरमध्ये. दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये अशी न्यायालये स्थापन करणे नियोजित आहे.

## ❖ प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT- Maharashtra Administrative Tribunal) :
- ४२ व्या घटना दुरुस्तीनुसार प्रशासकीय न्यायालयाची निर्मिती राज्यमंत्रीमंडळ करते.
- या न्यायालयात राज्यसरकारी कर्मचारी, अधिकारी व महामंडळातील कर्मचारी यांच्या बाबतीत हे खटले चालतात.

# लोकपाल आणि लोकायुक्त

- स्कॅन्डिनेव्हियन देशातील 'अम्बुड्समन' या संस्थेशी साधर्म्य सांगणारी भारतीय व्यवस्थेतील संस्था म्हणजे लोकपाल होय. सर्वप्रथम १८०९ मध्ये स्वीडनमध्ये उदयास आलेल्या या संस्थेचा पुढे २० व्या शतकात अनेक देशांनी स्वीकार केला. मनमानी स्वरुपाच्या प्रशासकीय यंत्रणेविरुद्ध उदयाला येऊ पाहणाऱ्या लोकशाही शासनयंत्रणेचे प्रतिकात्मक रुप म्हणून लोकपाल ही संस्था नावारुपास येत आहे.

## ❖ आवश्यकता :

- प्रचलित राजकीय प्रणालीच्या कार्यकक्षेत लोकनिर्वाचित पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यावर नियंत्रण ठेवणारी वर्तमान साधने प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचार, गैरकारभाराची प्रकरणे उत्तरोत्तर वाढत आहेत.
- केंद्रीय दक्षता आयोगास केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट व गैरकारभारांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. प्रचलित व्यवस्थेत केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखा ही भ्रष्टाचार व गैरकारभारांच्या प्रकरणाची चौकशी करणारी सर्वोच्च संस्था पंतप्रधानांच्याच नियंत्रणाखाली कार्य पाहते. त्यामुळे केंद्रशासनाच्या दबाव व प्रभावापासून मुक्तपणे कार्य करु शकत नाही.
- अनेक देशांतील अनुभव असे दर्शवतो की 'लोकपाल' ही संस्था भ्रष्टाचार, गैरकारभार, मनमानी निर्णयाविरुद्ध उपाययोजना करण्यात लक्षणीयरित्या यशस्वी ठरली आहे.भारतीय राजकीय व्यवस्थेत १९६० च्या दशकात भ्रष्टाचारी प्रकरणे वाढल्यामुळे लोकपाल संस्थेची स्थापना करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात झाली.
- १९६६ साली स्थापना केलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने केंद्रीय पातळीवर लोकपाल आणि घटकराज्य पातळीवर लोकायुक्ताचे पद निर्माण करण्याची शिफारस केली. सुधारणा आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन प्रथमत: १९६८ मध्ये लोकसभेत प्रलंबित असताना लोकसभा विसर्जित झाल्यामुळे पारित होऊ शकले नाही. त्यानंतर लोकपाल विधेयक १९७१, १९७७, १९८५, १९८९, १९९८, २००१, २००८, २०१० आणि २०११ अलीकडे २०११ मध्ये सभागृहासमोर मांडण्यात आले. केवळ १९८५ साली विधेयक माघारी घेण्यात आले होते. तथापि वर्तमान विधेयकाचा अपवाद वगळता प्रत्येक वेळी विधेयक राज्यसभेत प्रलंबित असताना अथवा समिती अवस्थेत असताना लोकसभा बरखास्त झाल्याने पारित होऊ शकले नाही.

## ❖ उद्दिष्टे :

१. लोकांना जलद आणि किफायतशीर स्वरुपात न्याय मिळवून देणे.
२. शासन–प्रशासन यंत्रणेतील भ्रष्ट, बेकायदेशीर व गैरप्रकार तसेच मनमानी निर्णयपद्धतीस प्रतिबंध घालणे आणि
३. शासन–प्रशासन पारदर्शक, जबाबदार आणि लोकशाहीवादी करणे.

- लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व त्यांच्यावर झालेल्या अन्यायांचे निवारण करण्यासाठी संसदेत लोकपाल आणि राज्य कायदेमंडळात लोकायुक्त हे पद असते. स्वीडनमध्ये प्रथमत: या अधिकारपदाची निर्मिती झाली.
- भारतात सर्वप्रथम राजस्थान प्रशासनाने सुधार समितीच्या अहवालात लोकपालाची मागणी केली.
- १९६३ ला लोकसभा सदस्य सिंघवी यांनी एका प्रस्तावात अशा संस्थेची मागणी केली.

## ❖ नेमणूक :

- लोकपालाची नेमणूक केंद्रशासन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी नेत्यांच्या सल्ल्याने करते.
- लोकायुक्ताची नेमणूक लोकपालाच्या सल्ल्याने केली जाते.

## ❖ कार्यकाल :

- दोन्ही अधिकाऱ्यांचा कार्यकाल ५ वर्षे असतो. निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय पद स्वीकारता येत नाही.
- लोकपालाचे पगार, भत्ता इ. सर्व सरन्यायाधिशासारख्याच असतात.
- लोकपालाने केलेल्या चौकशीमध्ये न्यायालय हस्तक्षेप करत नाही.
- जिथे न्यायालय आहे तिथे लोकपाल तक्रारी ऐकू शकत नाही.

## ❖ लोकपाल – लोकायुक्ताची कार्ये व अधिकार :-

- प्रशासकीय अधिकारी तसेच न्यायाधीश कायदे पाळतात की नाही हे बघण्याचा अधिकार लोकपालाला आहे.
- कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडून त्याला हवी ती माहिती तो मिळवू शकतो.
- काम पार पाडण्यासाठी लागणारी गुप्त कागदपत्रे पाहण्याचा त्याला अधिकार आहे.
- कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द खटला चालविण्याचा अधिकार लोकपालाला आहे.

## ❖ लोकपाल पदाचे महत्त्व :

- शासनाच्या नियमित क्रियांमध्ये नागरिकांचा त्यांच्या तक्रारी मांडणे आणि परिवर्तनाची मागणी करणे या करिता काही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मार्ग उपलब्ध असतात. परंतु बहुतांशवेळा ते कठीण असतात. प्रशासकीय विभागांमध्ये एका अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात त्याच्या वरिष्ठाकडे अपील करावे लागते आणि ही अपील करण्याची प्रक्रिया त्या खात्याच्या / विभागाच्या प्रमुखापर्यंत करावी लागते. तथापि, या यंत्रणेची काही अंतभूत वैगुण्ये आहेत. वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांशी समान हितसंबंधांनी जोडलेले असतात, कारण ते एकाच खात्यात काम करीत असतात. त्यामुळे एखाद्या अपीलाबाबत निष्पक्षपातीपणे न्यायनिवाडा केला जाईल, याबद्दल शंका राहते.
- कायदेमंडळाच्या पातळीवर, एखादी व्यक्ती त्याच्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधीकडे तक्रार नोंदवू शकते. परंतु सामान्य माणसाला लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचणे कठीण असल्याने ते एक मिथकच ठरते.
- राज्यसंस्थेच्या अंगांपैकी, व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायमंडळाने अधिक विश्वासार्हता कमावलेली आहे. तथापि, न्यायालयीन खटल्यांच्या संदर्भात कार्यपध्दतीत्मक गुंता-गुंतीमुळे खटला दाखल करण्यापासून ते अंतिम निकाल येईपर्यंत न्याय मिळण्यामध्ये अपरिहार्यपणे विलंब होतो. विलंबाने न्याय मिळणे म्हणजे एकप्रकारे न्याय नाकारण्यासारखेच असते.
- भ्रष्टाचाराच्या खटल्यांमध्ये झालेल्या वाढीमुळे एक बाब निदर्शनास येते की, निर्वाचित प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या उपलब्ध साधने परिणामकारक ठरत नाहीत. केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी 'केंद्रीय दक्षता आयोगा'ची स्थापना करण्यात आली. देशाची प्राथमिक तपास यंत्रणा असणारी सीबीआय ही कर्मचारी, प्रशासन, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन (पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली) या खात्यांच्या नियंत्रणात काम करते. त्यामुळे तपास कार्यादरम्यान राजकीय दबावापासून ती मुक्त असू शकत नाही.
- सीबीआयच्या कार्यात दिसून येणाऱ्या स्वातंत्र्य आणि व्यावसायिकता यांच्या अभावामुळे अलीकडील काळात सर्वोच्च न्यायालयाने त्यावर ताशेरे ओढले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर स्वत:ची तपास यंत्रणा असणाऱ्या लोकपाल पदाची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे सोप्या, स्वतंत्र, जलदगतीने आणि कमी खर्चात लोकांच्या तक्रारी निकालात काढण्याची यंत्रणा निर्माण करणे गरजेचे बनले. इतर देशांतील या संस्थेच्या यशावरुन स्पष्ट झाले की, ही संस्था लोकशाही आणि नागरी हक्कांची संरक्षक ठरलेली आहे.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★